SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

गुरुवार, दिनांक २ डिसेंबर, २०२१

विनियम क्रमांक ८/२०२१

क्रमांक : ८/२०२१ दिनांक : २.१२.२०२१

विद्यापीठ रुग्णवाहिका (Ambulance) रुग्णसेवेकरिता वापराबाबतचे विनियम, २०२१

ज्याअर्थी विद्यापीठ आरोग्य विभागाकरिता रुग्णवाहिका खरेदीस्तव बँक ऑफ महराष्ट्र यांचेकडून त्यांचे सीएसआर मधून प्राप्त अर्थसहाय्य रू. १०.०० लक्ष आणि रुग्णवाहिकेचे खरेदी मूल्य लक्षात घेता उर्वरीत राशी रू. ७.५० लक्ष "Investment on Deprecation Reserve Fund/Interest" या शिर्षातुन खर्च करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केली.

आणि

ज्याअर्थी विद्यापीठ रुग्णवाहिका (Ambulance) रुग्ण सेवेकरिता वापराबाबत नियमावली तयार करण्यास्तव व्यवस्थापन परिषदेने समितीचे गठन केले आहे.

आणि

ज्याअर्थी वरील प्रयोजनार्थ व्यवस्थापन परिषदेद्वारा गठीत समितीने तयार केलेली नियमावली दि. ०७.०५.२०२१ (तहकुब सभा दि. ०९.०४.२०२१) चे आयोजित व्यवस्थापन परिषदेने बाब क्र. ७२ अन्वये मान्य केली.

त्याअर्थी, विद्यापीठ रुग्णवाहिका (Ambulance) रुग्णसेवेकरीता वापराबाबत खालीलप्रमाणे विनियम तयार करण्यात येत आहे.

व्याख्या

१) विद्यापीठ रुग्णवाहिका (Ambulance) रुग्णसेवेकरिता वापराबाबतचे विनियम क्र. ... ८../२०२१ असे संबोधण्यात येईल.

२) हे विनियम व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या दिनांकापासून अस्तित्वात येतील.

३) **व्याख्या**

अ) "विद्यापीठ आरोग्य केंद्र" म्हणजे विद्यापीठ परिसरात आपातकालीन परिस्थिती किंवा आपत्तीमुळे उद्‌भवलेल्या आजारी रुग्णाला किंवा जखमी रुग्णाला त्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्वरीत प्रतिसादाची आवश्यकता लक्षात घेवून प्राथमिक उपचार मिळण्यास्तव स्थापित करण्यातआलेले विद्यापीठ आरोग्य केंद होय.

ब) "रुग्णवाहिका" म्हणजे आजारी किंवा जखमी रुग्णांना उपचाराच्या ठिकाणी आणि दरम्यान रुग्णांना सुरक्षितता व सांत्वन मिळवून देण्यासाठी आणि आजार वाढू नये अथवा अतिरिक्त इजा होवून नये हे टाळण्यास्तव रुग्णाला वाहुन नेणारे वाहन.

क) "रुग्णवाहिका चालक" म्हणजे ज्या व्यक्तीकडे वैध व्यावसायिक वाहन चालकाचा परवाना आहे.

४) विद्यापीठ रुग्णवाहिका, विद्यापीठ आरोग्य केंद्राच्या प्रत्यक्ष नियंत्रणाअंतर्गत रुग्णसेवेकरीता उपलब्ध राहील.

५) प्राधिकरणाचे पदाधिकारी विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी रोजदारीवरील कर्मचारी आणि इतर कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थीनी/निवासी विद्यार्थी, विद्यार्थिनी प्रशासकीय विभागातील अधिकारी/कर्मचारी, केंद्रीय मूल्यांकन भवन येथील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी, शैक्षणिक कामानिमित्य विद्यापीठ परिसरात असतील असे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थीनी, शिक्षकेत्तर कर्मचारी, अभ्यागत ह्यांचे पैकी कार्यालयीन कामकाजाचे वेळेस एखाद्याचे संदर्भात आपातकालीन परिस्थिती उद्‌भवल्यास अथवा विशेषत: गंभीर आजारी किंवा गंभीर जखमींना निश्चित काळजी घेण्यासाठी विद्यापीट आरोग्य अधिकारी यांच्या देखरेखीखाली, जवळच्या योग्य इस्पितळात सुरक्षितपणे नेण्याकरिता विद्यापीट रुग्णवाहिका वापरल्या जाईल.

६) विद्यपीठ रुग्णवाहिकेचा वापर वैद्यकीय सेवा पुरवठा/आपात्कालीन पुरवठा आणि रक्तपुरटा करण्यासाठी देखील केला जाईल.

७) विद्यापीठ रुग्णवाहिका आजारी/गंभीर किंवा जखमींना व मृत व्यक्तींना जवळच्या इस्पितळात/ घरी/ आवश्यक ठिकाणी नेण्याव्यतिरिक्त इतर कुठल्याही कारणाकरिता वापरल्या जाणार नाही.

८) विद्यापीठ रुग्णवाहिका २४ तास सज्ज आणि सुस्थितीत तसेच रुग्ण इस्पितळात नेण्याअगोदर आणि नंतर योग्यरित्या स्वच्छ आणि निर्जंतुकीकरण करण्याची जबाबदारी विद्यापीठ आरोग्य अधिकाऱ्यांच्या अधिनस्त असलेल्या आरोग्य परिचराची राहील तद्नंतरच रुग्णवाहिका वापरल्या जाईल.

९) विद्यापीठ रुग्णवाहिका सेवा थेट विद्यापीठ आरोग्य अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली राहील. तद्वतच, विद्यापीठ रुग्णवाहिकेमध्ये भरावयाचे इंधन, देखभाल, कंत्राटी वाहनचालक असल्यास अशा वाहन चालकाचे देयके तयार करून प्रमाणित करणे इ. बाबतची कार्यवाही प्रत्यक्ष विद्यापीठ आरोग्य अधिकारी हे त्यांचे स्तरावर करतील.

१०) विद्यापीठ रुग्णवाहिकेचा प्रशिक्षीत वाहनचालक कार्यालयीन कामकाजाचे वेळेत, आरोग्य अधिकाऱ्यांचे अधिनस्त राहील. तसेच, कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर आपातकालीन परिस्थिती उद्भवल्यास विद्यापीठ आरोग्य अधिकारी त्यांना तात्काळ पाचारण करतील आणि वाहन चालक त्याप्रमाणे उपस्थितीत होवून कर्तव्यास राहील.

११) विद्यापीठ रुग्णवाहिके मार्फत आजारी रुग्ण अथवा जखमी रुग्ण तपासणीसाठी अथवा उपचारासाठी ज्या जवळच्या इस्पितळात रुग्णाला वाहून नेल्या जाईल आणि सदरच्या इस्पितळात भरती केले जाईल अश्या इस्पितळाच्या ठिकाणी आजारी रुग्णाची अथवा जखमी रुग्णाची तपासणी सुरू असेपर्यंत विद्यापीठ रुग्णवाहिका आणि चालक यांना तेथे थांबणे आवश्यक राहील.

१२) अमरावती शहर स्थित विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा, युवा महोत्सव अशा कार्यक्रमांना रुग्णवाहिका मागणीनुसार कार्यरत राहील.

१३) अमरावती शहरस्थीत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांद्वारे आयोजित क्रीडा स्पर्धा, सांस्कृतीक कार्यक्रम अथवा विद्यार्थ्यांशी निगडीत कार्यक्रमाकरिता संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विहित कालावधीकरिता रुग्णवाहिका (विशिष्ट रुग्णांच्या बाबतीत नव्हे) उपलब्ध करून देण्यासंदर्भात मागणी/विनंती केली असल्यास अशा वेळेस त्या कालावधी दरम्यान (Stand-by-time) रुग्णवाहिका आणि चालक तेथे उपस्थित राहण्यासंदर्भात वरिष्ठांच्या पूर्व परवानगीने आरोग्य अधिकारी तसे निर्देशित करतील आणि सदरील सेवेकरिता मुलभूत दर खालीलप्रमाणे राहील.

रुग्णवाहिकेचे दरपत्रक

अ. क्र.	परिक्षेत्र	दर प्र. कि.मी./रुपये
१	अमरावती महानगरपालिका परिक्षेत्रात १० कि. मी. पर्यंत (येणेजाणे)	३०० रुपये
२	अमरावती महानगर पालिका परिक्षेत्रात १० कि. मी. च्यावर (येणेजाणे)	५०० रुपये
३	अमरावती महानगर पालिका परिक्षेत्राच्या बाहेर	१५ रु. प्र. कि. मि.
४	प्रतिक्षा शुल्क (८ तासांच्या पुढे प्रती तास)	७५ रुपये

१४) विद्यापीठ परिक्षेत्राच्या पाचही जिल्ह्यांमधील संलग्नीत महाविद्यालयांचे शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी/ विद्यार्थी/विद्यार्थीनी ह्या शैक्षणिक कामानिमित्त विद्यापीठात येत असतील अशा आलेल्या व्यक्तीपैकी एखाद्याचे बाबतीत विद्यापीठ परिसिरात आपातकालीन परिस्थिती उद्भवल्यास अश्या वेळेस सदर्हु रुग्ण व्यक्तीला उपचारासाठी जवळच्या इस्पितळात विद्यापीठ रुग्णवाहिकेने वाहुन उपचारासाठी भरती करणे आणि उपचारप्रसंगी दुर्दैवी प्रसंग उद्भवल्यास रुग्णाच्या नातेवाईकांनी मागणी केल्यास वरिष्ठांच्या परवानगीने मयत व्यक्तीला त्यांचे घरापर्यंत विद्यापीठ रुगणवाहिकेमधून पोहचते करण्यात येईल. तथापी त्यास्तव खालील अटी बंधनकारक असतील.

अ) मयत रुग्ण विद्यार्थी/विद्यार्थीनी असल्यास सदर्हु सेवा नि:शुल्क राहील.

ब) मयत रुग्ण शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी असेल तथापि अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असेल आणि त्यांनी तसे सुचविले असेल अश्या वेळेस मयत रुग्णाला वाहून नेण्यासाठी मुलभूत दर आकारल्या जाईल त्यामध्ये रुग्णवाहिकेचा प्रवास दर, किलोमिटर दर आणि प्रतिक्षा वेळ प्रती अर्धातास अशी गणना करण्यात येईल.

क) उपरोक्त (ब) मध्ये नमुद अर्टीची गणना केल्यास येणाऱ्या राशीपैकी ४० टक्के राशीचे वहन संबंधीत महाविद्यालयाचे व्यवस्थापन आणि ६० टक्के राशीचे वहन विद्यापीठ करेल.

१५) विद्यापीठ शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी, शैक्षणिक कामानिमित्त विद्यापीठ परिसरात आलेले महाविद्यालयीन शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनी आणि शैक्षणिक कामानिमित्य विद्यापीठात आलेले महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थीनी ह्यांचे पैकी एखाद्याचे संदर्भात आपातकालीन परिस्थिती उद्‌भवल्यास अशा आजारी रुग्णाला किंवा जखमी रुग्णाला विद्यापीठ आरोग्य अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली विद्यापीठ रुग्णवाहिकेमधून उपचारासाठी नजीकच्या इस्पितळात वाहून नेल्या जाईल.

१६) विद्यापीठ शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यापैकी एखाद्याने आपल्या कुटुंबातील आजारी रुग्ण अथवा जखमी रुग्णाला वाहून नेण्यासाठी विद्यापीठ रुग्णवाहिकेची मागणी केल्यास परिस्थितीनुरुप वरिष्टांच्या परवानगीने ती उपलबध करून देता येईल. तथापि, सदर्हु रुग्णाला अमरावती शहराबाहेर उपचारासाठी वाहून नेण्यासाठी विद्यापीठ रुग्णवाहिका उपलब्ध करून देता येणार नाही.

१७) अमरावतीस्थित असलेली विद्यार्थी/विद्यार्थीनी वसतिगृहे तथापी सदर्हु वसतीगृहांचे संचलन/नियंत्रण हे संलग्नीत महाविद्यालयाच्या नियंत्रणाअंतर्गत येत असेल अथवा शासकीय नियंत्रणाअंतर्गत येत असेल अशा सर्व वस्तीगृहांच्या संचालकांनी रुग्णवाहिकेची मागणी केल्यास वरिष्टांच्या पुर्वपरवानगीने विद्यापीठ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येईल आणि त्याप्रसंगी सदरील सेवेकरिता उपरोक्त परिच्छेद १३ मध्ये दर्शविलेले मुलभुत दर आकारल्या जाईल.

*****